## प्रसिध्दी पत्रक

दिनांक : ०९/०३/२०२४

**आरोपी लोकसेवक डॉ. अश्विनी गोरे यांनी रक्तपेढीच्या तपासणी अहवालात त्रुटी न काढण्यासाठी पन्नास हजारांची लाच मागणी केली व त्यांचे पती डॉ. प्रितम राऊत यांनी ती लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.वजिराबाद गुरनं १२०/२०२४ कलम ७,७ A १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०९/०३/२०२४ रोजी ०४.४५ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) डॉ. अश्विनी किशनराव गोरे, वय ४२ वर्षे, पद – वैदयकीय अधिकारी, उपजिल्हा रूग्णालय उदगीर, जि. लातुर अतिरिक्त कार्यभार प्रादेशिक रक्त संक्रमण अधिकारी, (वर्ग –१), प्रादेशिक रक्त संक्रमण कार्यालय,धाराशिव, जि. धाराशिव,<br>२) डॉ. प्रितम तुकाराम राऊत, वय ४८ वर्षे, (आलोसे क्र. १ यांचे पती) पद – वैदयकीय अधिकारी, अस्थीरोग तज्ञ, (वर्ग –१), शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रूग्णालय, धाराशिव, जि. धाराशिव. दोघे रा. क्वॉर्टर्स क्र.३, क्लास १ क्वॉर्टर्स, सिव्हील हॉस्पिटल कॅम्पस, मारवाडी गल्ली, धाराशिव, जि. धाराशिव |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,१०,००० /– रूपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५०,०००/– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | ५०,०००/– रूपये |

**थोडक्यात माहिती**

यातील तक्रारदार यांचे डॉक्टर लेन, नांदेड येथे रक्तकेंद्र (रक्तपेढी) आहे. दि. ०७/०३/२०२४ रोजी यातील आलोसे डॉ. अश्विनी गोरे यांनी दुपारी एक वाजण्याचे सुमारास त्यांचे रक्त केंद्राला (रक्तपेढी) भेट देवून तपासणी केली. तपासणी झाल्यानंतर जातेवेळी दुपारी साडे चार वाजण्याचे सुमारास त्या तक्रारदार यांना म्हणाल्या की, रक्त केंद्राच्या तपासणीत त्रुटी न काढण्यासाठी रू. १,१०,०००/– द्यावे लागतील, नाही तर तुमचे रक्तकेंद्र कायमचे बंद करण्याची कारवाई केली जाईल. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना आता सध्या पैसे नाहीत असे म्हणाले असता, आलोसे क्र. १ यांनी आता जेवढे आहेत तेवढे द्या असे सांगितले. आलोसे डॉ. अश्विनी गोरे यांना मागितलेली रक्कम नाही दिली तर ते तक्रारदार यांचे रक्तकेंद्र बंद करण्याची कारवाई करतील या भितीने तक्रारदार यांनी त्यांना रू. १०,०००/–दिले. त्यानंतर आलोसे क्र. १ यांनी उर्वरित रू. १,००,०००/– दि. ०८/०३/२०२४ रोजी दया, ते पैसे घेण्यासाठी मी माणूस पाठविते असे त्यांनी तक्रारदार यांना सांगितले. सदरची रक्कम रु. १,००,०००/– ही लाच असल्याचे तक्रारदार यांना खात्री झाल्याने, त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.

दि.०८/०३/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणीसाठी आरोपी लोकसेविका डॉ. अश्विनी गोरे यांचे मोबाईलवर पंचासमक्ष कॉल लावला असता, आलोसे यांनी कॉल उचलला नाही. लगेच तक्रारदार यांना एक कॉल आला व त्याने सांगितले की, मला डॉ. अश्विनी गोरे मॅडम यांनी तुम्हाला भेटण्यास सांगितले आहे, तुम्ही पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड समोर या असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांना पंचासह पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड समोर पडताळणीसाठी पाठविले असता, त्याठिकाणी एक इसम आला व त्याने मला डॉ. अश्विनी गोरे मॅडम यांनी पाठविले आहे असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी डॉ. अश्विनी गोरे यांना खात्री करण्यासाठी पंचासमक्ष मोबाईलवर कॉल केला असता, त्यांनी तक्रारदार यांना तेथे माळी आलेले आहेत. आणले का, किती आणले, त्यांना द्या, असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार यांनी रू. ५०,०००/– आणलेले आहेत असे सांगितले असता, आलोसे यांनी तुम्ही दिलेला शब्द पाळा, ठरल्याप्रमाणे दया असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार यांनी आज सुट्टीचा दिवस आहे. पैसे जमवाजमव करायला वेळ लागेल असे सांगितले. तेव्हा आलोसे यांनी ठिक आहे माझ्या माणसाकडे दया असे म्हणून फोन कट केला.

तक्रारदार यांनी आलोसे क्र.२ डॉ. प्रितम राऊत यांना पैसे घेवून येतो असे म्हणून परत आले. त्यानंतर तक्रारदार यांनी आलोसे क्र.२ यांची पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड समोर पंचासमक्ष भेट घेतली असता. आलोसे क्र.२ डॉ. प्रितम तुकाराम राऊत यांनी तक्रारदार यांच्याकडून पंचासमक्ष सदरची लाच रक्कम रू. ५०,०००/– स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आलोसे क्र. २ यांना रंगेहाथ पकडले.

आरोपी लोकसेवक डॉ. प्रितम तुकाराम राऊत यांना ताब्यात घेण्यात आले असुन पो.स्टे. वजीराबाद, जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड चे पोलीस अधीक्षक डॉ.राजकुमार शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधीक्षक राजेंद्र पाटील, तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक गजानन बोडके, पोना/राजेश राठोड, पोना/बालाजी मेकाले, पोकॉ/सय्यद खदीर, पोकॉ/अरशद खान, चापोना/प्रकाश मामुलवार, सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.



| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलचपत प्रतिबंधक विभाग नांदेड


Scanned with CamScanner